महाराष्ट्र शासन

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

क्र. रासाप्रपक/कृषी १३२२/प्र.क्र.००२/ EWS,NCL,CVC,TVC/ दिनांक :

# महत्वाची सूचना

**शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करिता कृषी व कृषी संलग्न व्यावसायिक पदवी (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमांच्या केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक विविध प्रमाणपत्रांबाबत......**

संदर्भ : शासन पत्र क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.१९१/तांशि-४, दिनांक १५/०९/२०२२

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कृषी विभागाअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता कृषी व कृषी संलग्न पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या राखीव प्रवर्गातील उमेदवार प्रवेश घेण्यास इच्छुक असतील त्यांनी EWS,NCL,CVC आणि TVC प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावेत, जेणेकरुन अशा सर्व उमेदवारांना संबंधित अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रथम फेरीत त्या त्या राखीव प्रवर्गातुन गुणवत्तेनुसार जागा वाटप करणे शक्य होईल. केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान उमेदवारांकडे सदरील EWS,NCL,CVC आणि TVC प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी प्रमाणपत्र मिळण्याकरीता संबंधित कार्यालयात केलेल्या अर्जाची पावती अपलोड करावी. ऑनलाईन अपलोड केलेल्या पावतीच्या आधारे संस्थेत "तात्पुरता प्रवेश" देण्यात येईल.

संदर्भाधिन शासन पत्रात शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे **कृषी शिक्षण अभ्यासक्रमांस प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या संबंधित उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रे केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरिता (EWS,NCL,CVC आणि TVC) निर्धारीत करण्यात आलेल्या अंतिम दिनांकांपर्यंत दिनांक ०१/११/२०२२ पर्यंत सादर करणे बंनधनकारक राहील.** अन्यथा अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द करण्यात येवून पुढील केंद्रिभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरीद्वारे पात्रतेनुसार खुल्या प्रवर्गातून प्रवेशासाठी ग्राहय राहतील, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(श्री. रविंद्र जगताप) भा.प्र.से.
आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

Scanned with CamScanner